सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**
कृषि विभाग
**नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प**
३० अ/ब अर्केड, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड , मुंबई ४०० ००५

दूरध्वनी क्र. ०२२-२२१६३३५१ ई-मेल: **mahapocra@gmail.com**

जा.क्र. नादेकृसंप्र/प्र.क्र.३४/प्रशासन दिनांक - २३/०४/२०१८

प्रति,

महासंचालक (माहिती व जनसंपर्क),
माहिती व जनसंपर्क कार्यालय,
मुख्य इमारत, तळ मजला, मंत्रालय, मुंबई ३२.

**विषय : - वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करणेबाबत.**

महाराष्ट्रातील १५ जिल्हयांमध्ये नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (PoCRA) राबविण्यात येत असून, सदर प्रकल्पासाठीची काही संवर्गीय पदे रिक्त राहिल्यास ती सेवानिवृत्त अधिकारी/ कर्मचाऱ्यांमधुन सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १७ डिसेंबर, २०१६ च्या शासन निर्णयानुसार भरण्यास शासनाने मंजूरी दिली आहे. त्याअनुषंगाने राज्य शासनाच्या संबंधित संवर्गातून सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांची या प्रकल्पात प्रथमत: एका वर्षाकरिता पूर्णत: कंत्राटी स्वरूपात नियुक्ती करण्यासाठी प्रसिध्द करावयाच्या जाहिरात सुचनेची प्रत सोबत जोडली आहे.

सदरील जाहिरात एका मराठी दैनिक वर्तमानपत्रात (सर्व आवृत्ती) प्रकाशित करावी व त्याबाबतचे देयक प्रकल्प संचालक, नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प, ३० अ/ब अर्केड, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई ४०० ००५ यांच्या नावे पाठविण्यात यावे.

**जाहिरात प्रसिध्द करण्याची तारीख :- २७ एप्रिल, २०१८.**

सहपत्र :- जाहिरात सूचना (दोन प्रती)

**(विकास चंद्र रस्तोगी)**
**प्रकल्प संचालक**

**प्रत :-**

**आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, पुणे यांना सहपत्रासह तसेच करार पध्दतीने नियुक्ती करावयाच्या पदां**बाबतच्या सविस्तर माहितीसह अग्रेषित.

२. त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी सोबतची जाहिरात सूचना व **करार पध्दतीने नियुक्ती करावयाच्या पदां**बाबतची सविस्तर माहिती **विभागाच्या** संकेतस्थळावर प्रसिद्ध करावी .

## नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प (PoCRA)

महाराष्ट्रातील १५ जिल्हयांमध्ये नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (PoCRA) राबविण्यात येत आहे. सदर प्रकल्पामध्ये संवर्गीय पदे रिक्त राहिल्यास ती सेवानिवृत्त अधिकारी/ कर्मचाऱ्यांमधुन सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १७ डिसेंबर, २०१६ च्या शासन निर्णयानुसार भरण्यास शासनाने मंजूरी दिली आहे. त्याअनुषंगाने राज्य शासनाच्या सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या खालील संवर्गातील अधिकाऱ्यांची या प्रकल्पात प्रथमत: एका वर्षाकरिता पूर्णत: कंत्राटी स्वरूपात नियुक्ती करावयाची आहे.:-

| अ.क्र. | सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी | पदसंख्या |
|---|---|---|
| | **अ) प्रकल्प व्यवस्थापन कक्ष, मुंबई** | |
| १) | कृषि अभियंता (Agricultural Engineer)<br>(अधिक्षक कृषि अधिकारी /कृषि उप संचालक संवर्गातील पद) | १ |
| २) | हायड्रोलॉजिस्ट/जिओलॉजिस्ट (भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेतील पद) | १ |
| ३) | तंत्र अधिकारी (महाराष्ट्र कृषि सेवेतील गट- ब संवर्गातील पद) | ५ |
| ४) | लेखाअधिकारी (महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा) | १ |
| | **ब) जिल्हा स्तर (एकूण १५ जिल्हे)** | |
| ५) | प्रकल्प विशेषज्ञ-कृषि (महाराष्ट्र कृषि सेवेतील गट- ब (कनिष्ठ) संवर्गातील पद) | १५ |
| | **क) उप विभाग स्तर (एकूण ३६ उपविभाग)** | |
| ६) | लेखाधिकारी (महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा) | ३६ |

सदर नियुक्ती सामान्य प्रशासन विभागाच्या क्र. संकिर्ण -२७१५/प्र.क्र.१००/१३, दिनांक १७ डिसेंबर, २०१६ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार करण्यात येणार आहे.

अधिक माहिती विभागाचे संकेतस्थळ http://krishi.maharashtra.gov.in/१२६०/PoCRA वर उपलब्ध आहे. इच्छुक व्यक्तींनी वेबसाईटवरील माहिती पाहून अर्ज करावेत.

(विकास चंद्र रस्तोगी)
प्रकल्प संचालक

## Details on Website

## नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प, मुंबई

**नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पामध्ये विविध संवर्गातील रिक्त पदांवर संबधित सेवेतील सेवानिवृत्त राज्य शासकीय अधिकाऱ्यांची करार पध्दतीने नियुक्ती करण्याबाबत.**

**विभागाची आवश्यकता** : महाराष्ट्रातील १५ जिल्हयांमध्ये नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प (PoCRA) राबविण्यात येत आहे. सदर प्रकल्पामधील विविध संवर्गीय पदे रिक्त राहत असल्याने ती सेवानिवृत्त अधिकाऱ्यांमधुन खाली नमूद पात्रता/अर्हता धारण करणाऱ्या राज्य शासनाच्या सेवेतून खाली नमूद संवर्गातून सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांची नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प, मुंबई येथील तसेच जिल्हा व उप विभाग स्तरावर करार पध्दतीने प्रथम एका वर्षाकरिता नियुक्ती करावयाची आहे.

| अ.क्र. | पदनाम | पदे | आवश्यक पात्रता/अर्हता |
|---|---|---|---|
| १) | कृषि अभियंता (Agricultural Engineer) | १ | १) कृषि उप संचालक /अधिक्षक कृषि अधिकारी या पदावरुन सेवानिवृत्त झालेले असावे.<br>२) संगणक वापराचे ज्ञान असणे आवश्यक |
| २) | तंत्र अधिकारी | ५ | १) महाराष्ट्र कृषि सेवेतील गट- ब या पदावरुन सेवानिवृत्त झालेले असावे.<br>२) संगणक वापराचे ज्ञान असणे आवश्यक |
| ३) | प्रकल्प विशेषज्ञ - कृषि | १५ * | १) महाराष्ट्र कृषि सेवेतील गट- ब (कनिष्ठ) या पदावरुन सेवानिवृत्त झालेले असावे.<br>२) संगणक वापराचे ज्ञान असणे आवश्यक |
| ४) | हायड्रोलॉजिस्ट/जिओलॉजिस्ट | १ | १) भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेतील हायड्रोलॉजिस्ट/ जिओलॉजिस्ट या गट- अ मधील पदावरुन सेवानिवृत्त झालेले असावे.<br>२) संगणक वापराचे ज्ञान असणे आवश्यक |
| ५) | लेखाअधिकारी | ३७ ** | १) लेखाअधिकारी (महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा) गट- ब या पदावरुन सेवानिवृत्त झालेले असावे.<br>२) संगणक वापराचे ज्ञान असणे आवश्यक |

प्रकल्प विशेषज्ज्ञ- कृषि या संवर्गातील जिल्हा स्तरावरील पदे व लेखाअधिकारी या संवर्गातील उप विभाग स्तरावरील पदे यांची यादी :-

| अ.क्र. | **जिल्हा स्तर (१५ जिल्हे) ***<br>प्रकल्प विशेषज्ज्ञ- कृषि, (महाराष्ट्र कृषि सेवेतील गट- ब (कनिष्ठ) संवर्गातील पद) | **उप विभाग स्तर (३६ उपविभाग) ****<br>लेखाअधिकारी (महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा) |
|---|---|---|
| १ | **औरंगाबाद** | **औरंगाबाद**, वैजापूर, सिल्लोड |
| २ | जालना | जालना, परतूर |
| ३ | बीड | बीड, माजलगांव, अंबाजोगाई |
| ४ | जळगांव | जळगांव, अमळनेर, पाचोरा |
| ५ | **लातूर** | लातूर, उदगीर |
| ६ | परभणी | परभणी |
| ७ | नांदेड | नांदेड, देगलूर, किनवट |
| ८ | हिंगोली | हिंगोली |
| ९ | उस्मानाबाद | उस्मानाबाद, भुम, |

| | | |
|---|---|---|
| १० | **अमरावती** | अमरावती, मोर्शी, अचलपूर |
| ११ | अकोला | अकोला, अकोट |
| १२ | बुलढाणा | बुलढाणा, मेहकर, खामगांव |
| १३ | वाशिम | वाशिम |
| १४ | यवतमाळ | यवतमाळ, दारव्हा, पुसद, पांढरकवडा |
| १५ | वर्धा | वर्धा, आर्वी, हिंगणघाट |

**अटी व शर्ती :-**

१) सदर नियुक्ती **केवळ** एका वर्षाकरिता सामान्य प्रशासन विभागाच्या क्र. संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दिनांक १७ डिसेंबर, २०१६ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार करण्यात येणार आहे.

२) विभागास आवश्यक असलेली अर्हता धारण करणाऱ्या मागील दोन वर्षात सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांना प्राधान्य देण्यात येईल.

३) उमेदवारास मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेचे चांगले ज्ञान असावे.

४) उमेदवाराचे वय ६५ वर्षापेक्षा अधिक नसावे.

५) उमेदवार संबधित अथवा लगतच्या जिल्ह्यात राहणारा असल्यास प्राधान्य.

६) आवश्यक अर्हता धारणा करणाऱ्या इच्छुक सेवानिवृत्त अधिकाऱ्यांनी सदर पदाकरिता विहित नमुन्यात अर्ज सादर करावा.(अर्जाचा नमूना सोबत जोडला आहे)

७) उमेदवाराने **सदर पदाकरिता अर्ज दिनांक ३१.५.२०१८ पर्यंत " प्रकल्प संचालक, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प, ३०-अ/ब अर्केड, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड,मुंबई-०५ या पत्त्यावर पोहोचेल अशा रितीने पोस्टाने पाठवावा अथवा व्यक्तीश: आणून द्यावा.** या संदर्भात अधिक माहितीसाठी ०२२-२२१६३३५१/०२२-२२१६३३५२ या दूरध्वनीवर संपर्क साधावा. विहित दिनांकानंतर प्राप्त झालेल्या अर्जावर कार्यवाही करण्यात येणार नाही तसेच या संदर्भातील कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेण्यात येणार नाही.

८) विभागास आवश्यक असलेली अर्हता व अनुभव नसलेल्या सेवानिवृत्त अधिकाऱ्यांनी अर्ज सादर केल्यास, अशा अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. तसेच अशा अर्जासंदर्भात शासनाशी/प्रकल्प कक्षाशी केलेल्या पत्रव्यवहाराची दखल घेण्यात येणार नाही. तसेच अशा अर्जांना उत्तर देण्यात येणार नाही.

९) मुलाखतीद्वारे पात्र उमेदवारांची निवड करण्यात येईल. उमेदवार निवडीबाबतचा संपूर्ण अधिकार विभागाचा/प्रकल्प कक्षाचा राहील.

१०) करार पध्दतीने नियुक्त सेवानिवृत्त अधिकाऱ्यांस नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प (PoCRA) राबविण्यात येत असलेल्या १५ जिल्हयांमध्ये अथवा प्रकल्प व्यवस्थापन कक्ष, मुंबई (पद परत्वे ) येथे नियुक्ती दिलेल्या ठिकाणी काम करावे लागेल.

११) कराराच्या कालावधीत सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी हे प्रकल्प संचालक नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प (PoCRA) यांच्या नियंत्रणाखाली अथवा त्यांनी पदनिर्देशित केलेल्या अधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली काम करतील व त्यांना कामकाजाचा अहवाल दरमहा सादर करतील.

१२) इतर अटी व शर्ती सामान्य प्रशासन विभागाच्या क्र. संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दिनांक १७ डिसेंबर, २०१६ च्या शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे तसेच शासनाकडून व प्रकल्प कक्षाकडून वेळोवेळी निश्चित केल्याप्रमाणे राहतील.

*******

## अर्जाचा नमुना

## सेवानिवृत्त राज्य शासकीय अधिकारी/कर्मचारी यांची करार पध्दतीने नियुक्ती करण्याकरिता अर्ज

उमेदवाराने अलीकडील काळातील स्वत:चे छायाचित्र येथे चिकटवावे

१) अर्जदाराचे संपूर्ण नांव :-..................................................................

२) अर्जदाराचा पत्ता :-..................................................................

३) सेवानिवृत्तीच्या वेळचे पदनाम व दिनांक :- ..................................................................

४) नियुक्तीसाठी ईच्छूक असलेले पद :-..................................................................

५) नियुक्तीसाठी कार्यालय प्राथम्य :- १) ..........................२)..........................३)....................

६) विभागीय चौकशी प्रस्तावित/प्रलंबित आहे काय? :- होय / नाही

७) भ्रमणध्वनी क्रमांक :-..................................................................

८) जन्म दिनांक व वय :-..................................................................

९) पदासाठी आवश्यक अर्हता अर्जदाराकडे आहे काय ? :- होय / नाही

१०) अनुभव / विशेष अर्हता असल्यास :-..................................................................

नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पामधील (PoCRA) विविध संवर्गातील रिक्त पदे करार पध्दतीने नियुक्तीबाबतची जाहिरात/सूचना मी काळजीपूर्वक वाचली असून, सदर जाहिरातीतील/सूचनेतील व सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दिनांक १७ डिसेंबर, २०१६ मधील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

ठिकाण :-

दिनांक :-

**अर्जदाराची स्वाक्षरी**